M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुंविमं/यो.प्र./ २६५३
वाशी, नवी मुंबई
दिनांक :२४/०६/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये

विषय:- उर्दू एज्युकेशन बोर्ड,नवी दिल्ली यांच्या समकक्षतेबाबत ...
संदर्भ:- राज्यमंडळ,पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/२१४४ दि.१६/०६/२०२५

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्य, यांना अवगत करून देण्यात येते की, उर्दू एज्युकेशन बोर्ड,नवी दिल्ली या बोर्डाच्या Writ Petition No.9740 of 2017 संदर्भातील मा. उच्च न्यायालयाने दिनांक 13/09/2017 रोजी, उर्दु एज्युकेशन बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे मंडळ परीक्षांचे अर्ज स्विकारून परीक्षेस प्रविष्ठ होणेची संधी देणेचे व नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याबाबत अंतरिम आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त आदेशानुसार उर्दू एज्युकेशन बोर्ड,नवी दिल्ली या बोर्डातून इ.10 वी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी विभागीय मंडळाकडे पात्रता प्रमाणपत्र(Eligibility Certificate) मिळणेकरीता अर्ज सादर करू शकतात. पात्रता प्रमाणपत्र मिळणे संदर्भात आवश्यक कागदपत्रासह अटीची पुर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडळामार्फत मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून योग्यता प्रमाणपत्र देण्यात आल्यावर संबधित विद्यार्थ्यास मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इ.१२ वी परीक्षेचे आवेदन पत्र भरता येईल त्यानुसार शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाने कार्यवाही करावी.

सदर बाब आपल्या महितीस्तव कळविण्यात येत आहे.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार )
(प्र.)विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,वाशी नवी मुंबई - ४०० ७०३.

प्रत माहितीस्तव –
मा. सचिव,राज्यमंडळ पुणे